लोकमत
महाराष्ट्राचा मानबिंदू
पृष्ठे : १२+४ = १६, किंमत : ₹ ५.००
सातारा, शनिवार, दि. २९ फेब्रुवारी २०२०

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# बारावी पेपर सोशल मीडियावर टाकला

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोरेगाव** : येथील डी. पी. भोसले महाविद्यालयात बारावी परीक्षेत गणित विषयाची प्रश्नपत्रिका मोबाईलवरून सोशल मीडियावर पाठविल्याप्रकरणी विशाल संभाजी फाळके (रा. सातारारोड) विरोधात पर्यवेक्षिका पद्मा पलूसकर यांनी कोरेगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

याबाबत माहिती अशी की, डी. पी. भोसले महाविद्यालयाच्या तळमजल्यावरील खोली क्रमांक १० मध्ये शुक्रवारी गणिताचा पेपर होता. पर्यवेक्षिका पलूसकर यांच्यासह सहपर्यवेक्षक एस. एस. जाधव, आर. टी. ढोपे यांनी तपासणी करुन विद्यार्थ्यांना प्रवेश दिला होता. प्रश्नपत्रिका वाटल्यानंतर चौथ्या रांगेतील शेवटच्या अलीकडील बाकावर बसलेला विद्यार्थी विशाल फाळके हा बराचवेळ उत्तरपत्रिकेवर काहीही न लिहिता इकडे-तिकडे बघत बसला होता. काही वेळातच तो खाली पाहून घाईत प्रश्नपत्रिका सोडवत असल्याचे पर्यवेक्षिका पलूसकर यांच्या लक्षात आले. त्यांना फाळके याचे वर्तन संशयास्पद वाटले. त्यांनी पाहणी केली असता, त्याने डाव्या पायाच्या मांडीखाली मोबाईल लपवून ठेवला असल्याचे व तो सुरु असलेला दिसून आला. त्यांनी तातडीने मोबाईल ताब्यात घेतला. सहपर्यवेक्षक आर. टी. ढोपे यांनी मोबाईलची तपासणी केली असता, त्याने दुसऱ्या क्रमांकाच्या व्हॉट्सअपवर दहा मिनिटांच्या कालावधीत प्रश्नपत्रिकेची तीन छायाचित्रे पाठविले असल्याचे दिसून आले. कस्टोडियन खंदारे यांनी दिलेल्या दिशानिर्देशानुसार पर्यवेक्षिका पलूसकर यांनी फिर्याद दिली.